


सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर




माझी वसुंधरा अभियान 5.0 अंतर्गत

**•• फटाक्याबाबत जाहीर आवाहन ••**


Volume III Issue 18 Date 25-10-2024


# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

“इंद्रभुवन” अप्पासाहेब वारद मार्ग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन


# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## माझी वसुंधरा अभियान 5.0 अंतर्गत

## •• फटाक्याबाबत जाहीर आवाहन ••


सोलापूर महानगरपालिका अंतर्गत "माझी वसुंधरा अभियान व राष्ट्रीय स्वच्छ वायु उपक्रम" ची प्रभावी अंमलबजावणी करणेत येत असून शहरातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, भारत सरकार अधिसूचना क्रमांक G.S.R. 682 (E) Dt. 5.10.9999 अन्वये 125 dB (A1) पेक्षा जास्त आवाज निर्माण करण्या-या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे.

तसेच शासन परिपत्रक क्र. आरएलपी-1021/प्र.क्र.247/विशा-1ब (4) नुसार दीपावली हा दिव्यांचा तसेच प्रकाशाचा उत्सव मानला जातो. या उत्सवादरम्यान दरवर्षी मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतिषबाजी करणेत येते. त्यामुळे वायु व ध्वनी प्रदुषणाची पातळी वाढून जनसामान्यांच्या तसेच प्राणीमात्राच्यावर आरोग्यावर होणारे विपरित परिणाम दीपावली उत्सवानंतर बराच कालावधीपर्यंत दिसून येतात. कोरोना आजार झालेल्या किंवा होऊन गेलेल्या नागरिकांना फटाक्यांच्या धुरांमुळे वायू प्रदूषणाचा त्रास होण्याची भीती आहे. ही बाब विचारात घेऊन नागरिकांनी चालू वर्षी फटाके फोडण्याचे टाळावे व त्याऐवजी दिव्यांची आरास करुन पर्यावरणपूरक उत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

**सर्वांना दीपावली उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा...!!**

**सहा.आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**